रेलवे भर्ती बोर्ड | RAILWAY RECRUITMENT BOARD

सीईएन ०१/२०२६ सहायक लोको पायलट (एएलपी) के पद पर भर्ती

CEN 01/2026 Recruitment of Assistant Loco Pilot (ALP)

Test Date	04/11/2026
Test Time	12:30 PM - 1:30 PM
Subject	RRB ALP 2026 CBT 1

*** Note**
Correct Answer will carry 1 mark per Question.
Incorrect Answer will carry 1/3 Negative mark per Question.

1. Options shown in green color with a tick icon are correct.
2. Chosen option on the right of the question indicates the option selected by the candidate.

Section : **RRB ALP**

Q.1 **Which of the following pairs of glands secrete fluids that nourish sperm and help them remain active?**

Ans
✗ A. Testes and scrotum
✗ B. Vas deferens and urethra
✓ C. Seminal vesicles and prostate
✗ D. Scrotum and urethra

Q.2 **दिलेल्या मालिकेत प्रश्नचिन्हाच्या (?) जागी खालीलपैकी कोणता पर्याय येईल?**
62 73 95 139 227 ?

Ans
✗ A. 407
✓ B. 403
✗ C. 408
✗ D. 401

Q.3 **रोधकतेबद्दल खालीलपैकी कोणते विधान योग्य आहे?**

Ans
✓ A. दिलेल्या तापमानावर पदार्थाची रोधकता स्थिर राहते
✗ B. रोधकता विद्युत प्रवाहाच्या वारंवारतेवर अवलंबून असते
✗ C. लागू केलेल्या व्होल्टेजनुसार रोधकता बदलते
✗ D. रोधकता विद्युतप्रवाहानुसार बदलते

Q.4 **पुढील शब्दांवर आधारित हा प्रश्न आहे.**

ART LOW CRY FLU

प्रत्येक शब्दामध्ये, प्रत्येक स्वर हा इंग्रजी वर्णक्रमानुसार त्याच्या लगत नंतर येणाऱ्या अक्षराने बदलला जातो आणि प्रत्येक व्यंजन हे इंग्रजी वर्णक्रमानुसार त्याच्या लगत आधी येणाऱ्या अक्षराने बदलले जाते. तर अशा प्रकारे तयार झालेल्या किती अक्षर-समूहांमध्ये एकही स्वर असणार नाही?

Ans
✗ A. एक
✗ B. दोन
✗ C. चार
✓ D. तीन

Q.5 6 cm त्रिज्या आणि 14 cm उंची असलेल्या दंडगोलाचे वक्र पृष्ठफळ (cm^2 मध्ये) काढा.($\pi = 22/7$ वापरा)

Ans
- ✗ A. 524
- ✓ B. 528
- ✗ C. 522
- ✗ D. 526

Q.6 अरविंद A बिंदूपासून प्रवास सुरू करतो आणि उत्तरेकडे 9 km गाडी चालवतो. त्यानंतर तो उजवीकडे वळून 13 km गाडी चालवतो, पुन्हा उजवीकडे वळतो आणि 11 km गाडी चालवतो. त्यानंतर तो पुन्हा उजवीकडे वळतो आणि 18 km गाडी चालवतो. शेवटी तो उजवीकडे वळून 2 km गाडी चालवतो आणि P बिंदूवर थांबतो. तर पुन्हा A बिंदूवर पोहोचण्यासाठी त्याने किती अंतर (सर्वात कमी अंतर) आणि कोणत्या दिशेने गाडी चालवली पाहिजे? (स्पष्टपणे नमूद केल्याशिवाय सर्व वळणे केवळ 90 अंशांचे वळण आहेत असे समजावे.)

Ans
- ✗ A. पश्चिमेकडे 5 km
- ✗ B. पश्चिमेकडे 4 km
- ✓ C. पूर्वेकडे 5 km
- ✗ D. पूर्वेकडे 4 km

Q.7 A, B, E, F, G, H आणि I या प्रत्येकाची परीक्षा, सोमवारी सुरू होऊन त्याच आठवड्याच्या रविवारी संपणाऱ्या एकाच आठवड्याच्या वेगवेगळ्या दिवशी आहे. E ची परीक्षा शनिवारी आहे. H ची परीक्षा A च्या लगत आधी आहे. B ची परीक्षा F च्या नंतरच्या कोणत्याही एका दिवशी आहे. I ची परीक्षा A च्या लगत नंतर आहे. E आणि G यांच्या दरम्यान केवळ एका जणाची परीक्षा आहे. तर A आणि B यांच्या दरम्यान किती जणांची परीक्षा आहे?

Ans
- ✓ A. चार
- ✗ B. तीन
- ✗ C. दोन
- ✗ D. एक

Q.8 S, T, U, V, आणि W हे एका वर्तुळाकार टेबलाभोवती केंद्राकडे तोंड करून बसले आहेत. U हा S च्या लगतच उजवीकडे बसला आहे. V हा U च्या डावीकडे दुसऱ्या स्थानावर बसला आहे. W हा V चा लगतचा शेजारी नाही. तर W च्या लगतच डावीकडे कोण बसले आहे?

Ans
- ✗ A. V
- ✗ B. S
- ✓ C. U
- ✗ D. T

Q.9 विनोद बिंदू A पासून सुरुवात करतो आणि पूर्वेकडे 7 km गाडी चालवतो. त्यानंतर तो डावीकडे वळून 9 km गाडी चालवतो, पुन्हा डावीकडे वळतो आणि 3 km गाडी चालवतो. त्यानंतर तो पुन्हा डावीकडे वळून 15 km गाडी चालवतो. त्यानंतर तो पुन्हा डावीकडे वळतो आणि 5 km गाडी चालवतो. त्यानंतर तो उजवीकडे वळतो आणि 4 km गाडी चालवतो. शेवटी तो पुन्हा उजवीकडे वळून 9 km गाडी चालवतो आणि बिंदू P वर थांबतो. पुन्हा बिंदू A पर्यंत पोहोचण्यासाठी त्याला किती अंतरावर (सर्वात कमी अंतर) आणि कोणत्या दिशेने गाडी चालवावी लागेल? (निर्दिष्ट केल्याशिवाय सर्व वळणे केवळ 90 अंशाची आहेत)

Ans
- ✗ A. उत्तरेला 9 km
- ✓ B. उत्तरेला 10 km
- ✗ C. उत्तरेला 12 km
- ✗ D. उत्तरेला 11 km

Q.10 हा प्रश्न खालील शब्दांवर आधारित आहे.
DEN GOD WAR BOA
प्रत्येक शब्दात, प्रत्येक स्वर इंग्रजी वर्णक्रमानुसार त्याच्या लगतच नंतरच्या अक्षरात बदलले जाते आणि प्रत्येक व्यंजन इंग्रजी वर्णक्रमानुसार त्याच्या लगतच आधीच्या अक्षरात बदलले जाते. अशा प्रकारे तयार झालेल्या किती अक्षर-समूहांमध्ये एकही स्वर येणार नाही?

Ans
- ✗ A. दोन
- ✓ B. तीन
- ✗ C. चार
- ✗ D. एक

Black Book

Q.11 जुनी उपकरणे बदलून त्याऐवजी ऊर्जा-कार्यक्षम (energy-efficient) उपकरणे बसवल्यानंतर, एका कुटुंबाचा मासिक वीज वापर 15% ने कमी झाला. जर ते कुटुंब पूर्वी दरमहा 400 युनिट्स वीज वापरत असे, तर आता ते किती युनिट्स वीज वापरते?

Ans
- ✔ A. 340
- ✘ B. 365
- ✘ C. 300
- ✘ D. 345

Q.12 मोबाईल ॲक्सेसरीजच्या एका विक्रेत्याने 'एंड-ऑफ-सीझन सेल' दरम्यान न विकल्या गेलेल्या चार्जरचा साठा विकून मोकळा केला. या साठ्याची मूळ किंमत ₹6,000 होती, परंतु दुकानातील जागा मोकळी करण्यासाठी तो ₹5,700 ला विकला गेला. विक्रेत्याचे नुकसान (₹ मध्ये) किती झाले?

Ans
- ✘ A. 280
- ✔ B. 300
- ✘ C. 320
- ✘ D. 290

Q.13 दिलेली मालिका तार्किकदृष्ट्या पूर्ण होण्यासाठी प्रश्नचिन्हाच्या (?) जागी खालीलपैकी कोणता अक्षर-संख्या समूह येईल?
RGZ 12, VDD 17, ZAH 22, DXL 27, ?

Ans
- ✘ A. GVR 30
- ✔ B. HUP 32
- ✘ C. HWQ 30
- ✘ D. GUQ 32

Q.14 या प्रश्नात, संख्या/चिन्हांचा समूह खाली दिलेल्या संकेतानुसार आणि पुढील अटींनुसार अक्षर संकेतांचा वापर करून संकेतबद्ध केला आहे. अटींचे पालन करणारे संकेतांचे योग्य संयोजन हे तुमचे उत्तर असेल. कोणत्याही अटीचे पालन न झाल्यास, संबंधित संख्या/चिन्हासाठीचे संकेत सारणीमध्ये दिल्याप्रमाणे थेट वापरावेत.

संख्या/चिन्ह ! * 3 # @ % 8 6 $?

संकेत A E B D L Z T Q J I

अटी–
(i) जर पहिला घटक चिन्ह असेल आणि शेवटचा घटक संख्या असेल, तर पहिल्या आणि शेवटच्या घटकांच्या संकेतांची अदलाबदल करावी.
(ii) जर दुसरा आणि तिसरा घटक विषम संख्या असतील, तर तिसऱ्या घटकाला दुसऱ्या घटकाचा संकेत द्यावा.
(iii) जर चौथा घटक चिन्ह असेल आणि पाचवा घटक संख्या असेल, तर दोन्ही घटकांसाठी © हा संकेत वापरावा.

खालील संख्या आणि चिन्हांच्या गटासाठी कोणता संकेत आहे?
! * 3 # @

Ans
- ✔ A. AEBDL
- ✘ B. AEQDL
- ✘ C. LEBDL
- ✘ D. ZEBDL

Q.15 सरळ रूप द्या $(17pq + 16q)^2 - (17pq - 16q)^2$.

Ans
- ✘ A. $1088p^2q$
- ✘ B. $544p^2q^2$
- ✔ C. $1088pq^2$
- ✘ D. $544pq^2$

Q.16 हा प्रश्न खाली दिलेल्या पाच तीन-अंकी संख्यांवर आधारित आहे.
(डावीबाजू) 241 826 356 742 961 (उजवीबाजू)
(उदाहरण- 697 – पहिला अंक = 6, दुसरा अंक = 9 आणि तिसरा अंक = 7)

दुसऱ्या सर्वात मोठ्या संख्येच्या तिसऱ्या अंकाचा दुसऱ्या सर्वात लहान संख्येच्या तिसऱ्या अंकाशी गुणाकार केल्यास मिळणारे उत्तर किती असेल?

Ans
- ✔ A. 36
- ✘ B. 18
- ✘ C. 56
- ✘ D. 9

Q.17 एक नळ एक टाकी 8 तासांत भरतो, तर दुसरा नळ पूर्ण टाकी 16 तासांत रिकामी करतो. जर टाकी सुरुवातीला रिकामी असेल आणि दोन्ही नळ एकाच वेळी उघडले, तर टाकी अर्धी भरायला किती वेळ (तासांमध्ये) लागेल?

Ans
- ✘ A. 24
- ✘ B. 12
- ✘ C. 16
- ✔ D. 8

Q.18 मूल्यांकन करा.

$$\frac{\sin^2\theta - 2\sin^4\theta}{2\cos^3\theta - \cos\theta}$$

Ans
- ✔ A. tanθsinθ
- ✘ B. cotθsinθ
- ✘ C. tanθsecθ
- ✘ D. cosθcotθ

Q.19 खाली दिलेल्या दोन जोड्यांच्या रचनेप्रमाणेच रचना असलेली जोडी निवडा. दोन्ही जोड्यांची रचना समान आहे.

TRT–WUW
IGI–LJL

Ans
- ✘ A. DAB–GEG
- ✔ B. DBD–GEG
- ✘ C. DBD–FEF
- ✘ D. DAB–FDF

Q.20 सोडवा: $(\frac{9x^2-68xy+64y^2}{3x-8y} - 3x + 8y + \frac{10xy}{3x-8y})(\frac{64y^2-9x^2}{3x+8y})$

Ans
- ✔ A. 10xy
- ✘ B. −10xy
- ✘ C. 3x − 8y
- ✘ D. 3x + 8y

Q.21 L, M, N, O, G, H आणि I या प्रत्येकाची परीक्षा एकाच आठवड्यातील वेगवेगळ्या दिवशी आहे, जी सोमवारपासून सुरू होऊन त्याच आठवड्यातील रविवारी संपते. फक्त M ची परीक्षा N च्या आधी आहे. L आणि H यांच्या दरम्यान फक्त तीन लोकांची परीक्षा आहे. I आणि N यांच्या दरम्यान फक्त तीन लोकांची परीक्षा आहे. O ची परीक्षा H च्या आधीच्या एखाद्या दिवशी आणि G च्या नंतर एखाद्या दिवशी आहे. L नंतर किती लोकांची परीक्षा आहे?

Ans
- ✔ A. चार
- ✘ B. तीन
- ✘ C. दोन
- ✘ D. एक

Black book

Q.22 जेव्हा एखाद्या कार्बन संयुगाचे पुरेशा ऑक्सिजनच्या उपस्थितीत संपूर्ण ज्वलन होते, तेव्हा कोणता वायू नेहमी तयार होतो?

Ans
- ✗ A. मिथेन
- ✗ B. कार्बन मोनॉक्साईड
- ✓ C. कार्बन डायऑक्साइड
- ✗ D. ऑक्सिजन

Q.23 एक दुकानदार 78 डझन वस्तू ₹168 प्रति डझन या दराने खरेदी करतो. तो प्रत्येक वस्तू ₹35 एवढ्या किमतीला विकतो. तर, त्याच्या नफ्याची टक्केवारी किती असेल?

Ans
- ✗ A. 140%
- ✗ B. 130%
- ✓ C. 150%
- ✗ D. 160%

Q.24 N, Q, V, C, T, G आणि K यापैकी प्रत्येकाची परीक्षा सोमवारपासून सुरू होऊन त्याच आठवड्याच्या रविवारी समाप्त होणाऱ्या आठवड्याच्या वेगवेगळ्या दिवशी आहे. G ची परीक्षा गुरुवारी आहे. V नंतर केवळ पाचच व्यक्तींची परीक्षा आहे. K आणि G यांच्या दरम्यान केवळ एकाच व्यक्तीची परीक्षा आहे. Q ची परीक्षा G च्या आधी आहे, परंतु C च्या नंतर आहे. T ची परीक्षा शुक्रवारी नाही. तर K च्या लगत आधी कोणाची परीक्षा असेल?

Ans
- ✗ A. T
- ✗ B. C
- ✗ C. G
- ✓ D. N

Q.25 Ai, Bf, Cx, Dj, Ey, Fu आणि Gt गोलाकार टेबलाभोवती टेबलाच्या मध्याकडे तोंड करून बसलेले आहेत. Bf हा Cx च्या उजवीकडे दुसऱ्या स्थानावर आहे. Gt हा Cx च्या डावीकडे दुसऱ्या स्थानावर आहे. Dj हा Ai च्या लगत डाव्या बाजूला बसला आहे. Ey हा Fu च्या उजव्या बाजूला दुसऱ्या स्थानावर बसला आहे. Ey च्या डावीकडून मोजल्यावर Ey आणि Gt यांच्या दरम्यान किती जण बसलेले आहेत?

Ans
- ✗ A. तीन
- ✗ B. एक
- ✓ C. दोन
- ✗ D. चार

Q.26 एका विशिष्ट सांकेतिक भाषेत, 'UHRD' हे '57' असे संकेतबद्ध केले आणि 'SALM' हे '63' असे संकेतबद्ध केले आहे. तर दिलेल्या सांकेतिक भाषेत 'YFCP' साठी काय संकेत असेल?

Ans
- ✓ A. 58
- ✗ B. 52
- ✗ C. 61
- ✗ D. 55

Q.27 एका प्रयोगादरम्यान, एक विद्यार्थी चुकीने तरफेच्या भार भुजाला असा भाग समजतो जिथे नेहमी बल लागू केले जाते. या गैरसमजाचे निराकरण करण्यासाठी कोणती संकल्पना सर्वात योग्य आहे?

Ans
- ✗ A. पाया म्हणजे बलाची दिशा होय
- ✗ B. भार भुजा टेकूला आधार देते
- ✗ C. टेकू (fulcrum) म्हणजे बल लागू करण्याचा बिंदू होय
- ✓ D. आयास भुजा (effort arm) म्हणजे जिथे बल लागू केले जाते

Q.28 $12 \sin y + \cos y = \sqrt{8} \sin y$ असल्यास, tan y चे मूल्य शोधा.

Ans

✗ A. $\frac{-12 - \sqrt{8}}{141}$

✗ B. $\frac{-13 - \sqrt{8}}{136}$

✓ C. $\frac{-12 - \sqrt{8}}{136}$

✗ D. $\frac{-12 - \sqrt{8}}{146}$

Q.29 एका विशिष्ट तर्कानुसार 21 हे 147 सह संबंधित आहे. त्याच तर्कानुसार, 25 हे 175 सह संबंधित आहे. त्याच तर्कानुसार, 33 हे दिलेल्या पर्यायांपैकी कशाशी संबंधित आहे?
(टीप: संख्यांना त्यांच्या घटक अंकांमध्ये विभाजित न करता, पूर्ण संख्यांवर क्रिया कराव्यात. उदा.13 – 13 या संख्येवर केलेली क्रिया जसे की, 13 ची बेरीज/वजाबाकी/गुणाकार इ. क्रिया केली जाऊ शकते. 13 चे 1 आणि 3 मध्ये विभाजन करणे आणि नंतर 1 आणि 3 वर गणितीय क्रिया करता येणार नाही)

Ans

✗ A. 241

✓ B. 231

✗ C. 221

✗ D. 251

Q.30 जर वृक्काणू मधील (nephron) निवडक पुनर्शोषणाचे (selective re-absorption) कार्य थांबले, तर खालीलपैकी काय घडण्याची शक्यता आहे?

Ans

✗ A. गाळण्याची प्रक्रिया पूर्णपणे थांबेल

✗ B. शरीरात अधिक टाकाऊ पदार्थ साठवले जातील

✓ C. आवश्यक पोषकद्रव्ये मूत्रावाटे निघून जातील

✗ D. मूत्राचे घनरूपात रूपांतर होईल

Q.31 हृदय आकुंचन पावते तेव्हा रक्ताद्वारे धमन्यांच्या भित्तीवर निर्माण होणारा दाब कोणत्या मूल्याद्वारे दर्शविला जातो?

Ans

✗ A. विस्फारणी दाब

✗ B. हवेचा दाब

✓ C. प्रकुंचनी दाब

✗ D. मध्य धमनी दाब

Q.32 खाली दिलेल्या दोन जोड्यांच्या रचनेप्रमाणेच रचना असणारी जोडी निवडा. दोन्ही जोड्यांची रचना समान आहे.

OAT : QWV
SSX : UOZ

Ans

✓ A. WKB : YGD

✗ B. TKY : WGB

✗ C. LWK : PUO

✗ D. UST : WPV

Q.33 या प्रश्नात, एका प्रश्नानंतर (I) आणि (II) असे क्रमांक दिलेली दोन विधाने दिली आहेत. प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी विधानांमधील माहिती पुरेशी आहे की नाही, हे तुम्हाला ठरवायचे आहे. दोन्ही विधाने वाचा आणि योग्य उत्तर निवडा.
A, W, V, G आणि E या 5 खांबांपैकी, ज्यांची उंची वेगवेगळी आहे, त्यापैकी कोणता खांब सर्वात लहान आहे?
(I) G हा केवळ एकाच खांबापेक्षा उंच आहे. A हा W पेक्षा उंच आहे.
(II) G हा E पेक्षा उंच आहे.

Ans
- ✗ A. प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी विधाने I. आणि II. दोन्ही मिळूनही पुरेशी नाहीत
- ✗ B. केवळ विधान II. मधील माहिती प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहे, तर विधान I. मधील माहिती पुरेशी नाही
- ✗ C. केवळ विधान I. मधील माहिती प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहे, तर विधान II. मधील माहिती पुरेशी नाही
- ✓ D. प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी विधाने I. आणि II. दोन्ही मिळून (आणि केवळ विधान I. किंवा केवळ विधान II. नाही) पुरेशी आहेत

Q.34 सरळरूप द्या:
$(6561)^{0.18} \times (6561)^{0.07}$

Ans
- ✓ A. 9
- ✗ B. 5
- ✗ C. 4
- ✗ D. 6

Q.35 इंग्रजी वर्णक्रमानुसार, खालील चारपैकी तीन अक्षर-समूह जोड्यांमध्ये एका विशिष्ट प्रकारे साधर्म्य आहे आणि म्हणून त्या एक गट तयार करतात. त्या गटात न बसणारी अक्षर-समूह जोडी निवडा.
(टीप: गटात न बसणारी अक्षर-समूह जोडी ही त्यातील व्यंजन/स्वरांच्या संख्येवर किंवा अक्षर-समूहातील त्यांच्या स्थानावर आधारित नसावी.)

Ans
- ✗ A. UQ – LH
- ✗ B. RN – IE
- ✗ C. EA – VR
- ✓ D. OK – GB

Q.36 AB आणि CD या दोन समांतर रेषा आहेत. EF ही आणखी एक रेषा या समांतर रेषांना अनुक्रमे M आणि N बिंदूंमध्ये छेदते. कोन BMN आणि कोन MND यांचे दुभाजक P या बिंदूत मिळतात. खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे?

Ans
- ✗ A. MNP हा काटकोन त्रिकोण नाही.
- ✗ B. MNP हा एक काटकोन त्रिकोण आहे, ज्याचा काटकोन M येथे आहे.
- ✓ C. MNP हा एक काटकोन त्रिकोण आहे, ज्याचा काटकोन P येथे आहे.
- ✗ D. MNP हा एक काटकोन त्रिकोण आहे, ज्याचा काटकोन N येथे आहे.

Q.37 या प्रश्नात, एका प्रश्नानंतर (I) आणि (II) क्रमांकाची दोन विधाने आहेत. विधानांमध्ये दिलेली माहिती प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहे का हे तुम्हाला ठरवायचे आहे. दोन्ही विधाने वाचा आणि योग्य उत्तर निवडा.

प्रश्न. गौतम, हिरल, इवान, जीविका आणि केशव हे पाच जण एका रांगेत उभे आहेत. तर सर्वात शेवटी कोण उभे आहे?

(I) हिरल इवानच्या मागे आहे पण गौतमच्या पुढे आहे.
(II) जीविका गौतमच्या मागे आहे आणि केशव जीविकाच्या मागे आहे.

Ans
- ✓ A. विधान I. आणि II. दोन्ही एकत्रितपणे (केवळ विधान I. किंवा केवळ विधान II. नाही) प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेसे आहेत.
- ✗ B. विधान I. आणि II. दोन्ही एकत्रितपणे प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेसे नाहीत.
- ✗ C. केवळ विधान II. मधील माहिती प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहे, तर विधान I. मधील माहिती पुरेशी नाही.
- ✗ D. केवळ विधान I. मधील माहिती प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहे, तर विधान II. मधील माहिती पुरेशी नाही.

Q.38 जर 'A' म्हणजे '÷', 'B' म्हणजे '×', 'C' म्हणजे '+' आणि 'D' म्हणजे '–' असेल, तर खालील समीकरणात प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?

2 B 1 D 6 A 2 C 3 = ?

Ans
- ✗ A. 5
- ✗ B. 8
- ✗ C. 7
- ✓ D. 2

Black

Q.39 दिलेल्या मालिकेत '?' च्या जागी काय येईल?
162 153 143 134 124 115 ?

Ans
✗ A. 103
✗ B. 112
✓ C. 105
✗ D. 108

Q.40 जर 5287463 या संख्येत प्रत्येक सम अंकात 1 मिळवला आणि प्रत्येक विषम अंकात 1 मिळवला, तर अशा प्रकारे तयार होणाऱ्या नवीन संख्येतील सर्व विषम अंकांची बेरीज किती असेल?

Ans
✗ A. 22
✗ B. 26
✓ C. 24
✗ D. 20

Q.41 REFLIMS या शब्दातील प्रत्येक स्वर इंग्रजी वर्णक्रमानुसार त्याच्या लगेच नंतरच्या अक्षरात आणि प्रत्येक व्यंजन इंग्रजी वर्णक्रमानुसार त्याच्या लगतच आधीच्या अक्षरात बदलले जाते. अशा प्रकारे तयार झालेल्या अक्षरांच्या नवीन गटामध्ये किती अक्षरे नेमकी दोनदा येतील?

Ans
✗ A. 1
✗ B. 3
✗ C. 2
✓ D. 0

Q.42 एका शाळेच्या डॅशबोर्डवर सलग पाच दिवसांची उपस्थिती नोंदवली जाते. चार दिवसांतील विद्यार्थ्यांची उपस्थिती 48, 50, 47 आणि 53 होती. जर डॅशबोर्डवरील सर्व पाच दिवसांची सरासरी उपस्थिती 50 विद्यार्थी दाखवत असेल, तर पाचव्या दिवशी किती विद्यार्थी उपस्थित होते?

Ans
✗ A. 51
✓ B. 52
✗ C. 50
✗ D. 54

Q.43 जर + म्हणजे -, - म्हणजे ×, × म्हणजे ÷, आणि ÷ म्हणजे + असेल, तर खालील समीकरणात प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?

86 - 13 ÷ 127 + 684 × 12 = ?

Ans
✗ A. 1122
✗ B. 1135
✗ C. 1169
✓ D. 1188

Q.44 CONSULT या शब्दातील प्रत्येक अक्षराची इंग्रजी वर्णक्रमानुसार मांडणी केल्यास किती अक्षरांचे स्थान(ने) बदलणार नाही?

Ans
✗ A. एकही नाही
✗ B. एक
✓ C. दोन
✗ D. तीन

Q.45 एक गाडी विराम अवस्थेपासून एका स्थिर दराने त्वरण वाढवते. 5 सेकंदांनंतर तिचा वेग 20 m/s इतका होतो. गतीच्या आलेखीय निरूपणाचा वापर करून, त्या 5 सेकंदांत पार केलेले अंतर शोधण्यासाठी तुम्ही कोणते समीकरण वापराल आणि त्याचे मिळणारे उत्तर काय असेल?

Ans
✓ A. $s = ut + 1/2\ at^2$ चा वापर करा, अंतर = 50 m
✗ B. $v = u + at$ चा वापर करा, अंतर = 20 m
✗ C. $p = mv$ चा वापर करा, अंतर = 25 m
✗ D. $F = ma$ चा वापर करा, अंतर = 100 m

black book

Q.46 एका विशिष्ट तर्कानुसार 4 हे 38 शी संबंधित आहे. त्याचप्रकारे, 9 हे 83 शी संबंधित आहे, तर त्या तर्कानुसार 13 हे खालीलपैकी कशाशी संबंधित असेल?
(सूचना : क्रिया संपूर्ण संख्येवर कराव्यात, तिच्यातील अंकांमध्ये त्या संख्येची विभागणी करू नये. उदाहरणार्थ, 13 – येथे 13 वर बेरीज/वजाबाकी/गुणाकार इ. क्रिया करणे अभिप्रेत आहे, मात्र 13 ची विभागणी 1 आणि 3 अशी करून 1 आणि 3 यांवर गणितीय क्रिया करणे अभिप्रेत नाही.)

Ans
- ✔ A. 119
- ✘ B. 115
- ✘ C. 112
- ✘ D. 109

Q.47 A, B, C, D आणि E यांची वये वेगवेगळी आहेत. C हा केवळ D आणि E पेक्षा लहान आहे. A हा B पेक्षा मोठा पण C पेक्षा लहान आहे, तर सर्वात लहान कोण असेल?

Ans
- ✔ A. B
- ✘ B. D
- ✘ C. A
- ✘ D. C

Q.48 एका प्रिमियम हेडफोनच्या छापील किंमतीवर अनुक्रमे 15% आणि 10% अशी सलग सूट दिल्यानंतर तो ₹15,300 मध्ये उपलब्ध होता. तर त्याची छापील किंमत (₹ मध्ये) किती होती?

Ans
- ✘ A. 21,000
- ✘ B. 19,500
- ✘ C. 18,000
- ✔ D. 20,000

Q.49 खालील अक्षरे आणि चिन्हांच्या मालिकेचा संदर्भ घ्या आणि त्यानंतर विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर द्या. मोजणी केवळ डावीकडून उजवीकडेच करायची आहे.

(डावी बाजू) J H # P N @ $ R & Z Ω T £ D V R Y (उजवी बाजू)

अशी किती व्यंजने आहेत की ज्यांच्या लगत आधी एक चिन्ह आणि लगत नंतर एक व्यंजन आहे?

Ans
- ✘ A. एकही नाही
- ✔ B. दोन
- ✘ C. तीन
- ✘ D. एक

Q.50 खालील अक्षरमालिकेचा संदर्भ घ्या आणि प्रश्नाचे उत्तर द्या.
(डावीबाजू) W Z L V B R O F V Y N K H V N T G B J D C Y Z Q D X (उजवीबाजू)
इंग्रजी वर्णक्रमानुसार डाव्या टोकाकडून तिसऱ्या आणि उजव्या टोकाकडून तिसऱ्या अक्षराच्या मध्ये किती अक्षरे असतील?

Ans
- ✘ A. पाच
- ✘ B. तीन
- ✔ C. चार
- ✘ D. सहा

Q.51 जर 'A' म्हणजे '÷' असेल, 'B' म्हणजे '×' असेल, 'C' म्हणजे '+' असेल आणि 'D' म्हणजे '−' असेल तर दिलेल्या समीकरणात प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय उत्तर येईल?

29 D 28 A 11 B 44 C 41 = ?

Ans
- ✔ A. −42
- ✘ B. −40
- ✘ C. −44
- ✘ D. −41

Q.52 PRINTED या शब्दातील प्रत्येक स्वर हा इंग्रजी वर्णक्रमानुसार त्याच्या लगत नंतरच्या अक्षराने बदलण्यात येतो आणि प्रत्येक व्यंजन हे इंग्रजी वर्णक्रमानुसार त्याच्या लगत आधीच्या अक्षराने बदलण्यात येते. अशा प्रकारे तयार झालेल्या अक्षरांच्या नवीन गटात खालीलपैकी कोणते अक्षर डावीकडून तिसरे असेल?

Ans
- ✗ A. S
- ✗ B. M
- ✗ C. F
- ✓ D. J

Q.53 दिलेल्या मालिकेला तार्किकदृष्ट्या पूर्ण करण्यासाठी प्रश्नचिन्हाच्या (?) जागी खालीलपैकी कोणता अक्षर-संख्या समूह येईल?
DFC 11, IKH 18, NPM 25, SUR 32, ?

Ans
- ✓ A. XZW 39
- ✗ B. ZWX 38
- ✗ C. VXZ 39
- ✗ D. UXW 38

Q.54 एक रक्कम वार्षिक 12% दराने चक्रवाढ व्याजावर (वार्षिक आकारणीनुसार) गुंतवली जाते. जर 2 वर्षांनंतर ती रक्कम ₹25,088 झाली असेल, तर गुंतवणूक केलेली रक्कम किती होती?

Ans
- ✗ A. ₹21,000
- ✗ B. ₹22,000
- ✗ C. ₹19,000
- ✓ D. ₹20,000

Q.55 दिलेल्या मालिकेत '?' च्या जागी काय येईल?

6 10 18 34 66 ?

Ans
- ✗ A. 133
- ✓ B. 130
- ✗ C. 134
- ✗ D. 128

Q.56 C, D, E, F, K, L आणि M ही सात खोकी एकावर एक ठेवली आहेत, पण ती याच क्रमाने ठेवली असतीलच असे नाही. F हे खालून दुसऱ्या क्रमांकावर ठेवले आहे. F आणि C यांच्यामध्ये फक्त तीन खोकी ठेवली आहेत. M हे F च्या खालीलपैकी एका स्थानावर ठेवले आहे. C आणि D यांच्यामध्ये फक्त E हे खोके ठेवले आहे. K हे C च्या वरीलपैकी एका स्थानावर ठेवले आहे. L आणि C यांच्यामध्ये किती खोकी ठेवली आहेत?

Ans
- ✗ A. एक
- ✗ B. तीन
- ✗ C. चार
- ✓ D. दोन

Q.57 E, F, G, H, W, X आणि Y ह्या सात व्यक्ती एका वर्तुळाकार टेबलाच्या केंद्राकडे तोंड करून बसल्या आहेत.
G हा F च्या उजवीकडे तिसऱ्या स्थानावर बसला आहे. H हा Y च्या उजवीकडे चौथ्या स्थानावर बसला आहे. F च्या डावीकडून मोजल्यास F आणि Y यांच्यामध्ये केवळ दोन व्यक्ती बसल्या आहेत. W हा H किंवा F यांचा लगतचा शेजारी नाही. X हा W चा लगतचा शेजारी नाही.तर E च्या उजवीकडे तिसऱ्या स्थानावर कोण बसलेले असेल?

Ans
- ✓ A. X
- ✗ B. F
- ✗ C. Y
- ✗ D. G

blackbook

Q.58 इंग्रजी वर्णक्रमानुसार, खालील चारपैकी तीन अक्षर-समूहांमध्ये एका विशिष्ट प्रकारे साधर्म्य आहे आणि म्हणून ते एक गट तयार करतात. तर या गटात न बसणारा अक्षर समूह कोणता असेल?
(सूचना: गटात न बसणारा अक्षर-समूह हा त्याच्या व्यंजन/स्वरांच्या संख्येवर किंवा अक्षर-समूहातील त्यांच्या स्थानावर आधारीत नसावा)

Ans
- ✗ A. UAEH
- ✓ B. GNQT
- ✗ C. VBFI
- ✗ D. RXBE

Q.59 एका कारच्या रेडिएटरमध्ये 84% अँटीफ्रीझचे द्रावण असणे आवश्यक आहे. एका वाहनचालकाकडे 54% अँटीफ्रीझ असलेले 4 लीटर द्रावण आहे. तर 84% अँटीफ्रीझ द्रावण तयार करण्यासाठी, त्याने आपल्या द्रावणात 95% अँटीफ्रीझ असलेले किती लीटर (2 दशांश स्थानांपर्यंत पूर्णांकित केलेले) द्रव मिसळले पाहिजे?

Ans
- ✗ A. 14.46
- ✗ B. 6.85
- ✓ C. 10.91
- ✗ D. 16.93

Q.60 $\left(\frac{11}{3}\right)^{3} \times \left(\frac{3}{11}\right)^{13} \times \left(\frac{11}{3}\right)^{6} = \left(\frac{3}{11}\right)^{3m+11}$ या समीकरणाचे समाधान करणारे m चे मूल्य काढा.

Ans
- ✗ A. $\frac{5}{3}$
- ✗ B. $-\frac{5}{3}$
- ✗ C. $\frac{7}{3}$
- ✓ D. $-\frac{7}{3}$

Q.61 एका मशीनची मूळ किंमत ₹25,000 आहे. जर घसाऱ्याचा दर वार्षिक 4% असेल, तर दोन वर्षांनंतर त्या मशीनची किंमत काढा.

Ans
- ✓ A. ₹23,040
- ✗ B. ₹24,400
- ✗ C. ₹24,040
- ✗ D. ₹23,400

Q.62 रोशन 25 km/h वेगाने बिंदू A ते बिंदू B पर्यंत धावतो आणि बिंदू B ते बिंदू A पर्यंत 31 km/h वेगाने धावत परत येतो. संपूर्ण प्रवासाचा सरासरी वेग काढा (दोन दशांश स्थानापर्यंत मर्यादित करा).

Ans
- ✗ A. 27.84 km/h
- ✓ B. 27.68 km/h
- ✗ C. 27.32 km/h
- ✗ D. 27.49 km/h

Q.63 50 cm व्यास असलेल्या वर्तुळात, एकमेकींपासून y cm अंतरावर असलेल्या 14 cm लांबीच्या दोन समान समांतर जीवा आहेत. तर, y चे मूल्य काढा.

Ans
- ✗ A. 28
- ✓ B. 48
- ✗ C. 24
- ✗ D. 36

blackbook

Q.64 या प्रश्नात, संख्या/चिन्हांचा समूह खाली दिलेल्या संकेत आणि पुढील अटींनुसार अक्षर संकेतांचा वापर करून संकेतबद्ध केला आहे. अटींना तर्कसंगत असलेल्या संकेतांचे योग्य संयोजन हे तुमचे उत्तर आहे. जर कोणत्याही अटींचे पालन न झाल्यास, संबंधित संख्या/चिन्हासाठीचे संकेत सारणीमध्ये दिल्याप्रमाणे तर्कसंगत असावेत.

संख्या/चिन्ह 8 6 % 5 # ! & 9 3 ?

संकेत Y A V J P Q N X K I

अटी–

(i) जर पहिला घटक चिन्ह असेल आणि शेवटचा घटक संख्या असेल, तर त्यांच्या संकेतांची परस्पर अदलाबदल करा.

(ii) जर दुसरा घटक आणि तिसरा घटक विषम संख्या असेल, तर तिसऱ्या घटकासाठी दुसऱ्या घटकाच्या संकेताचा वापर करा.

(iii) जर चौथा घटक चिन्ह असेल आणि पाचवा घटक संख्या असेल, तर त्या दोघांसाठी © ह्या संकेताचा वापर करा.

खालील गटासाठी कोणता संकेत असेल?

8 6 % 5 #

Ans

✗ A. YAVJZ

✗ B. PAVJP

✗ C. YANJP

✓ D. YAVJP

Q.65 कोणते विधान मूलद्रव्याच्या संयुजाचे सर्वोत्तम वर्णन करते?

Ans

✗ A. ही अणूच्या केंद्रकातील प्रोटॉन्सची एकूण संख्या आहे.

✗ B. ही केंद्रकातील न्यूक्लिऑन्सची एकूण संख्या आहे.

✓ C. ही गमावलेल्या, मिळवलेल्या किंवा सामायिक केलेल्या इलेक्ट्रॉन्सवर आधारित संयोग क्षमता आहे.

✗ D. हे अणूतील न्यूट्रॉन्स आणि प्रोटॉन्सच्या संख्येमधील फरक आहे.

Q.66 खालील अक्षरे आणि चिन्हांच्या मालिकेचा संदर्भ घ्या आणि प्रश्नाचे उत्तर द्या. मोजणी केवळ डावीकडून उजवीकडेच करायची आहे.

(डावीकडे) # V $ A U % * € V S C & O X & Z * % @ @ F I (उजवीकडे)

अशी किती अक्षरे आहेत की ज्यांच्या लगत आधी एक अक्षर आणि लगत नंतर एक चिन्ह आहे?

Ans

✗ A. 5

✓ B. 3

✗ C. 8

✗ D. 4

Q.67 खालीलपैकी कोणत्या संख्येला 19 आणि 46 या दोन्हीने (नि:शेष) भाग जाईल?

Ans

✓ A. 16606

✗ B. 17039

✗ C. 15005

✗ D. 17849

Q.68 एका विशिष्ट सांकेतिक भाषेत, 'XJCQ' हे '108' असे संकेतबद्ध केले आणि 'PNST' हे '78' असे संकेतबद्ध केले आहे. तर दिलेल्या सांकेतिक भाषेत 'OBYN' साठी काय संकेत असेल?

Ans

✗ A. 101

✗ B. 108

✗ C. 110

✓ D. 104

Q.69 एका व्यक्तीने ₹56,500 एवढी रक्कम वार्षिक 8% सरळ व्याजदराने, 3 वर्षांसाठी गुंतवली. तर, 3 वर्षांनंतर त्याला मिळणारी एकूण रक्कम (₹ मध्ये) किती असेल?

Ans

✗ A. 69,600

✗ B. 69,060

✗ C. 70,600

✓ D. 70,060

blackbook

Q.70 इंग्रजी वर्णक्रमानुसार एका विशिष्ट तर्काने ORVX हे YBFH शी संबंधित आहे. त्याचप्रमाणे, ADHJ हे KNRT शी संबंधित आहे. त्याच तर्कानुसार दिलेल्या पर्यायांपैकी कोणत्या पर्यायाशी JMQS संबंधित आहे?

Ans

✗ A. TXZB

✓ B. TWAC

✗ C. TVZC

✗ D. TWZC

Q.71 खाली संख्यांचे दोन संच दिले आहेत. संख्यांच्या प्रत्येक संचामध्ये, पहिल्या संख्येवर विशिष्ट गणितीय क्रिया करून दुसरी संख्या मिळवली आहे. त्याचप्रमाणे, दुसऱ्या संख्येवर विशिष्ट गणितीय क्रिया करून तिसरी संख्या मिळवली आहे आणि अशाच प्रकारे पुढे चालू राहते. दिलेल्या पर्यायांपैकी कोणता पर्याय प्रश्नात दिलेल्या संचांप्रमाणेच गणितीय क्रियांच्या आकृतीबंधाचे अनुसरण करतो?
(सूचना - दोन/तीन अंकी संख्या तिच्या स्वतंत्र अंकांमध्ये विभागणे अभिप्रेत नाही. उदा. जर 37 नंतर 10 असेल तर 3 + 7 अशी गणितीय क्रिया होऊ शकत नाही, कारण दोन/तीन अंकी संख्या स्वतंत्र अंकांमध्ये विभागण्यास परवानगी नाही.)
3 – 12 – 24 – 36 ; 5 – 20 – 40 – 52

Ans

✗ A. 8 – 32 – 64 – 74

✗ B. 6 – 30 – 60 – 72

✓ C. 4 – 16 – 32 – 44

✗ D. 7 – 28 – 54 – 66

Q.72 एका शाळेतील इयत्ता दहावीचा वर्ग A, B आणि C अशा तीन तुकड्यांमध्ये विभागला आहे. तुकडी A आणि तुकडी B मधील विद्यार्थ्यांचे गुणोत्तर 1 : 3 आहे, आणि तुकडी B आणि तुकडी C मधील विद्यार्थ्यांचे गुणोत्तरे 4 : 5 आहे. जर इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांची एकूण संख्या 341 असेल, तर तुकडी A मध्ये किती विद्यार्थी आहेत?

Ans

✗ A. 42

✓ B. 44

✗ C. 40

✗ D. 46

Q.73 एका लाकडी वृत्तचितीची त्रिज्या 20 cm आणि उंची 7 m असल्यास, तिच्या वक्रपृष्ठाला ₹165 प्रति m^2 या दराने पॉलिश करण्याचा एकूण खर्च (₹ मध्ये) किती होईल?

Ans

✓ A. 1,452

✗ B. 2,145

✗ C. 1,245

✗ D. 1,524

Q.74 एका चित्रपटाला दोन गटांतील प्रेक्षकांकडून रेटिंग मिळाले. चाळीस प्रेक्षकांनी सरासरी 8 गुण दिले, तर साठ प्रेक्षकांनी सरासरी 7 गुण दिले. तर एकूण सरासरी रेटिंग किती होते?

Ans

✗ A. 7.6

✗ B. 7.2

✗ C. 7.5

✓ D. 7.4

Q.75 एका स्टोअरमध्ये 3 : 8 या गुणोत्तरात X आणि Y या दोन प्रकारच्या डिजिटल स्टोरेज डिव्हाइसेसचा साठा केला जातो. जर 24 डिव्हाइसेस X प्रकारच्या असतील, तर Y प्रकारच्या डिव्हाइसेसची संख्या X प्रकारच्या डिव्हाइसेसपेक्षा कितीने जास्त असेल?

Ans

✗ A. 32

✗ B. 64

✓ C. 40

✗ D. 48

black